जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 OCT 2017

सकाळ



कोल्हापूर : राष्ट्रीय आंतर विद्यापीठ कव्वाली स्पर्धेत विजेतेपद मिळविणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या संघासमवेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. सुजित जाधव, सुरेश मोरे.

# 'कव्वाली'त विद्यापीठ संघ प्रथम

कोल्हापूर, ता. २२ : मुंबई येथे झालेल्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. आकर्षक चषक, प्रशस्तिपत्रक व रोख पंचवीस हजार रुपये असा पुरस्कार विद्यापीठाला प्रदान करण्यात आला. भारतीय विद्यापीठ महासंघातर्फे मुंबई विद्यापीठात राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय कव्वाली स्पर्धा झाली. पंजाब, हरियाना, मध्य प्रदेश, तसेच महाराष्ट्रातील एकूण दहा विद्यापीठांचे संघ सहभागी झाले.

विद्यापीठ संघाने सादर केलेल्या कव्वालीचे संगीत दिग्दर्शन सिद्धेश जाधव (मुंबई) व संपदा माने-कदम (मुंबई) यांनी केले. विजय जाधव व रवींद्र जाधव यांनी संगीत साथीदार म्हणून काम केले. प्रीती मनवाडकर, प्रथम लाड, ऋषीकेश देशमाने, काजल नरूटे, केदार गुरव, संज्योती जगदाळे, निलंजय वड्डलवार, आदिती धनवाडे, जीवन पाटील, काजल धुर्वे यांचा संघात समावेश होता. विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील यांनी परिश्रम घेतले. डॉ. सुजित जाधव, सुरेश मोरे यांनी संघ व्यवस्थापक म्हणून काम पाहिले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचे संघास प्रोत्साहन मिळाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 OCT 2017
लोकमत

# अधिकारी मंडळ सदस्यत्वासाठी आजपासून अर्ज दाखल होणार

## २० नोव्हेंबरला मतमोजणी : शिवाजी विद्यापीठ प्रशासनातर्फे तयारी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकारी मंडळाच्या सदस्यत्वासाठी आज, सोमवारपासून अर्ज दाखल करण्यास सुरुवात होणार आहेत. दि. ३१ ऑक्टोबरपर्यंत अर्ज भरण्याची मुदत आहे, अशी माहिती कुलसचिव विलास नांदवडेकर यांनी रविवारी सायंकाळी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. सदस्यत्वासाठी कोण कोण अर्ज दाखल करतात याकडे शैक्षणिक क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, अधिसभा, विद्या परिषद आणि अभ्यास मंडळाचा निवडणुकीचा समावेश आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार या निवडणुका घेण्यात येणार आहेत.



त्यामध्ये कायद्यातील तरतुदीनुसार अधिसभेसाठी दहा प्राचार्य, सहा व्यवस्थापन संस्था प्रतिनिधी, दहा महाविद्यालयीन शिक्षक प्रतिनिधी, तीन विद्यापीठ शिक्षक प्रतिनिधी आणि दहा नोंदणीकृत पदवीधरांचे प्रतिनिधी निवडण्यात येणार आहेत तर विद्या परिषदेवर प्रत्येक विद्याशाखेतून २ शिक्षक निवडून द्यावयाचे असून त्यापैकी एक शिक्षक राखीव प्रवर्गातून द्यायचा आहे तसेच आठ शिक्षकांमध्ये एक महिला शिक्षक निवडण्यात येणार आहे. त्याचबरोबर विद्यापीठातील एकूण चार विद्याशाखा अंतर्गत ४५ अभ्यास मंडळे आहेत. त्यातील प्रत्येक अभ्यास मंडळांसाठी महाविद्यालयीन विभाग प्रमुखांमधून तीन विभागप्रमुखांची निवड करण्यात येणार आहे.

या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख दि. ३१ ऑक्टोबर आहे तर ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज माघारी घेता येणार आहेत. प्रत्यक्ष मतदान १७ नोव्हेंबरला होणार असून मतमोजणी २० नोव्हेंबरला असणार आहे. याबाबत अधिक महिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 OCT 2017
तरुण भारत

# अधिकार मंडळांसाठी १७ नोव्हेंबर रोजी मतदान

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या सदस्यत्वासाठी रविवारी सायंकाळी निवडणूक सूचना जाहीर झाली. त्यानुसार अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यास मंडळासाठी १७ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. तर २० नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. यासाठी आजपासून अर्जभरण्यास सुरुवात होणार आहे. याबाबतची माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.



- कुलसचिव विलास नांदवडेकर यांची माहिती
- आजपासून अर्ज भरण्यास सुरुवात
- ४ नोव्हेंबरपर्यंतच अर्ज माघारी घेता येणार

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकांची अनेक दिवसांपासून तयारी सुरू होती. त्यासाठी मोर्चेबांधणीला प्रारंभ झाला होता. मात्र, निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला नव्हता. विद्यापीठ प्रशासनाकडून या निवडणुकांसाठी जय्यत तयारी सुरू होती. रविवारी कुलसचिवांच्या आदेशानुसार हा कार्यक्रम जाहीर झाला आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार या निवडणुका घेण्यात येणार आहेत. या कायद्यातील तरतुदीनुसार अधिसभेसाठी दहा प्राचार्य, सहा व्यवस्थापन संस्था प्रतिनिधी, दहा महाविद्यालयीन शिक्षक प्रतिनिधी, तीन विद्यापीठ शिक्षक प्रतिनिधी, आणि दहा नोंदणीकृत पदवीधरांचे प्रतिनिधी निवडण्यात येणार आहेत. विद्यापरिषदेवर प्रत्येक विद्याशाखेतून २ शिक्षक निवडून द्यायचे असून त्यापैकी एक शिक्षक राखीव प्रवर्गातून द्यायचा आहे. तसेच आठ शिक्षकांमध्ये एक महिला शिक्षिका निवडण्यात येणार आहे. याचबरोबर विद्यापीठातील एकूण चार विद्याशाखेतंर्गत ४ अभ्यासमंडळे आहेत. यातील प्रत्येक अभ्यासमंडळासाठी महाविद्यालयीन विभागप्रमुखांमधून तीन विभागप्रमुखांची निवड करण्यात येणार आहे.

उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख ३१ ऑक्टोबर असून ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज माघार घेता येणार आहेत. याबाबतची अधिक माहिती विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे कळवण्यात आले आहे.

23 OCT 2017
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अधिकार मंडळांसाठी १७ नोव्हेंबरला मतदान


शिवाजी विद्यापीठातून...

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या सदस्यत्वासाठीची निवडणूक सूचना रविवारी सायंकाळी जाहीर करण्यात आली. यानुसार अधिसभा, विद्या परिषद आणि अभ्यास मंडळांसाठी १७ नोव्हेंबरला मतदान व २० नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. या निवडीसाठी सोमवारपासून (दि. २३) उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ होत आहे, अशी माहिती विद्यापीठाचे कुलसचिव विलास नांदवडेकर यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळांच्या निवडणुकांची अनेक दिवसांपासून तयारी सुरू होती. त्यासाठी मोर्चेबांधणीलाही सुरुवात झाली होती; मात्र निवडणुकीचा कार्यक्रम अद्याप जाहीर झाला नव्हता. रविवारी कुलसचिव नांदवडेकर यांच्या आदेशाने हा कार्यक्रम जाहीर झाल्यामुळे यापुढील घडामोडींना वेग येणार आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार या निवडणुका पार पडणार आहेत.

अधिसभेसाठी दहा प्राचार्य, सहा व्यवस्थापन संस्था प्रतिनिधी, दहा महाविद्यालयीन शिक्षक प्रतिनिधी, तीन विद्यापीठ शिक्षक प्रतिनिधी व दहा नोंदणीकृत पदवीधरांचे प्रतिनिधी निवडण्यात येणार आहेत. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख ३१ आक्टोबर असून, ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज माघारी घेता येणार आहे. याबाबतची अधिक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली आहे.

23 OCT 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बालकांच्या प्रश्नाकडे लक्ष द्या : गव्हाणे

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २२ : बाल हक्कांच्या प्रश्नांकडे मानवतेच्या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पुणे येथील एमआयटीचे अधिष्ठाता डॉ. सुधीर गव्हाणे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग, एम. ए. मास कम्युनिकेशन व युनिसेफच्या संयुक्त विद्यमाने 'शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांचे मोड्यूल' विषयावर आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. युनिसेफच्या महाराष्ट्राच्या प्रमुख संवादतज्ज्ञ स्वाती मोहपात्रा उपस्थित होत्या. या वेळी ज्येष्ठ पत्रकार अरुण



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा वृत्तपत्र व संवादशास्त्र विभाग आणि युनिसेफच्या मदतीने आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेत बोलताना प्रा. सुधीर गव्हाणे.**

साधू यांना आदरांजली वाहिली.

डॉ. गव्हाणे म्हणाले, "भारतासारख्या देशात शाश्वत विकासाची उद्दिष्टे पूर्णत्वाला आणणे खूपच आवश्यक आहे." मोहपात्रा म्हणाल्या, "शाश्वत विकासाचे अनेक निकष आहेत. त्यामध्ये बालकांचा विकास, त्यांचे हक्क आणि अधिकार याला विशेष महत्त्व आहे. माध्यमांनी या अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयाकडे सकात्मक दृष्टीने पाहिले तर चित्र बदलू शकेल." युनिसेफचे संशोधक डॉ. मनिंदरसिंग सेठिया यांनी शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांचे मोड्यूलचे सविस्तर सादरीकरण केले. औरंगाबाद येथील रफिक झकेरिया सेंटरचे प्रमुख डॉ. शाहीद शेख, सोलापूर विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाचे प्रमुख डॉ. रवींद्र चिंचोलकर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ पत्रकारिता विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. दीपक शिंदे, जळगाव येथील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ पत्रकारिता विभागाचे प्रमुख डॉ. टी. व्ही. दौंड, वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. अनिलकुमार राय, मुंबईच्या एसएनडीटी विद्यापीठ पत्रकारिता विभागाच्या प्रमुख डॉ. मीरा देसाई, संचालक डॉ. कृष्णमूर्ती ठाकूर, पुणे विद्यापीठ पत्रकारिता विभागाचे प्रमुख डॉ. संजय तांबट, पुणे विद्यापीठ मीडिया स्टडीजच्या प्रमुख डॉ. माधवी रेड्डी, युनिसेफचे राज्यातील संवादतज्ज्ञ तानाजी पाटील, डॉ. रत्नाकर पंडित, पत्रकारिता विभागातील डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, चंद्रशेखर वानखेडे, गोविंद गोडबोले सहभागी झाले होते. विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी स्वागत केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 OCT 2017
सकाळ

# डॉ. लिहीतकर यांना परिषदेचे निमत्रंण



डॉ. लिहीतकर

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहिती शास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. शालिनी लिहीतकर यांना श्रीलंका येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी निमंत्रित करण्यात आले आहे. केलनिया विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागात 'ग्रंथालय आणि माहिती व्यवस्थापन' विषयावर २६ ते २८ ऑक्टोबर कालावधीत ही परिषद होत आहे. परिषदेत 'मेजरिंग रिसर्च इम्पॅक्ट थ्रू अल्टमेट्रिक्स' विषयावर त्या शोधनिबंध सादर करतील. त्यांनी यापूर्वीही देश-विदेशांतील अनेक आंतरराष्ट्रीय परिषदांतून शोधनिबंध सादर केले आहेत.